# प्रेसनोट

**पुणे शहरांत दिवसां व रात्रौचे वेळी घरफोडी व वाहन चोरीचे गुन्हे करणारा व एकूण ३५ गुन्हयांत फरारी असलेल्या अट्टल गुन्हेगारांस युनिट-५ गुन्हेशाखेने केले जेरबंद.**

पुणे शहरांत दिवसां व रात्रौचे वेळी होणा-यां घरफोडी व वाहन चोरीच्या गुन्हयांना आळा घालणेकामी व प्रतिबंध करणेकामी पुणे शहराचे रेकॉर्डवरील व फरारी असलेले गुन्हेगारांचा शोध घेणेबाबत मा.वरिष्ठांनी त्यांचे बैठकीत आदेश दिलेले असलेने त्या अनुषंगाने वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे वरीलप्रमाणेच एकूण ३५ चो-यांमध्ये पाहिजे व फरारी असलेला आरोपी नामेः- बैंतूसिंग शामसिंग कल्याणी याचा युनिट-५ कडील अधिकारी व कर्मचारी शोध घेत असतांना,युनिट-५ कडील पो.हवा.२८०४ रणसिंग व पो.ना.३७६८ वाघमारे यांना त्याचे बातमीदारांमार्फत मिळालेल्या बातमीवरुन पुणे शहरांतील वेगवेगळयां पोलीस स्टेशनकडील घरफोडी व वाहन चोरीचे गुन्हयांत निष्पन्न व पाहिजे असलेला आरोपी बैंतूसिंग शामसिंग कल्याणी हा त्याची सासरवाडी विजापुर कर्नाटक येथे लपुन रहात आहे.त्यावरुन विजापुर येथे तपासकामी अधिकारी व कर्मचारी पाठविण्यात आले त्यांनी विजापुर मध्ये जावुन तपास केला तेव्हा आरोपीस पोलीस शोधण्यास आल्याची खबर लागल्याने तो तेथुन फरार झाला होता तो पुणे येथे आला असलेची खात्रिशिरपणे माहिती युनिट-५ ला मिळाली. त्यामुळे तपास टिम परत पुणे येथे येवुन त्याचे नातेवाईक व मित्रांची माहिती घेतली तो दि.२०/०१/२०१८ रोजी गंगानगर येथील आपले मित्र व नातेवाईक यांना भेटणेकामी येणार असलेबाबत खात्रिशिर माहिती मिळाली.

सदरची माहितीचा आशय मा.प्रभारी अधिकारी,दत्ता चव्हाण,युनिट-५,गुन्हे,पुणे शहर यांना कळवून त्यांनी दिलेल्यां मार्गदर्शनपर सुचनां प्रमाणे गंगानगर,फुरसुंगी हडपसर पुणे येथे बातमीदारांसह आपले युनिटकडील सर्व अधिकारी व स्टाफ सापळा रचून बातमीतील ठिकाणी कॅनॉलचे बाजूने पाहिजे असलेला आरोपी नामेः- बैंतूसिंग शामसिंग कल्याणी रा.रामटेकडी हडपसर पुणे हा त्याचे ताब्यातील एक पांढरे रंगाचे शेवरलेट कं.ची.तवेरा कार नं. MH12FC-5121 या वाहनांसह जात असताना दिसला त्याचा पाठलाग करुन त्यास शिताफीने पकडले. सदरचे कारची झडती घेता त्यामध्ये दोन MH12-PH-9440 अशा नंबर असलेल्या नंबरप्लेटस् मिळून आल्याने त्यांस विश्वासांत घेवून कौशल्यपुर्वक तपास करतां त्याने व त्याचा साथीदार नामेः- संगतसिंग कल्याणी व त्याचे इतर दोन मित्र यांचे मदतीने हमालनगर मार्केटयार्ड येथुन शेवरलेट कं.ची. तवेरा कार चोरी करुन तिचा घरफोडी चोरी करणेकामी वापर करीत असलेबाबत सांगितले. त्यावरुन संबंधित भागांतील पो.स्टे.कडील माहिती घेता मार्केटयार्ड पो.स्टे.गुन्हा रजि.नं.२१३/२०१७ भा.दं.वि.क.३७९,३४ हा उघडकीस आला. तसेच सदर शेवरलेट कं.ची.तवेरा कार नं. MH12FC-5121 चा वापर करुन त्याने व त्याचे साथीदारांनी सिंहगड रोड येथे एका सोसायटीत घरफोडी चोरी करतांना तेथील पार्कींगमधील स्विफ्ट कारच्या नंबरप्लेट चोरी केल्याचे सांगितलेने त्याबाबत खात्री करता सिंहगड रोड पो.स्टे.३२८/२०१७ भा.दं.वि.क. ४५७,३८०,३७९, ५११,३४ हा गुन्हा उघडकीस आलेला आहे. तसेच त्याने व त्याचे साथीदाराने मागील पंधरा दिवसापुर्वी गंगानगर स्मशानभुमीजवळ फुरसुंगी येथुन एक मारुती इको गाडी चोरी केली होती ती त्याचेकडुन जप्त करण्यात आली असुन त्यावरुन हडपसर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.३१/२०१८ भा.दं.वि.क.३७९,३४ प्रमाणे हा गुन्हा उघडकीस आला आहे. वरील आरोपींकडून दोन चारचाकी वाहने व चोरीच्या नंबर प्लेटस् असा एकूण सर्व मिळुन किं.रु. ०८,००,२००/- चे मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे.

वरील आरोपी नामेः-बैंतूसिंग शामसिंग कल्याणी हा पुणे शहरांतील घरफोडी व वाहन चोरी करणारा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी ०५ गुन्हे दाखल असुन ता पुणे शहरातील येरवडा, स्वारगेट, बिबवेवाडी, सिहंगड रोड, भारती विद्यापीठ, सहकारनगर, विश्रांतवाडी, भोसरी अशा एकूण ३५ गुन्हयांमध्ये फरारी आरोपी असुन त्याचेकडून नव्याने ०३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच त्याचे दोन साथीदार व सोने घेणारा यापुर्वी अटक झाले आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे,मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,पुणे शहर श्री.पंकज डहाणे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर,श्री.संजय निकम यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी, श्री.दत्ता चव्हाण,सपो.निरी,युवराज नांद्रे,पोउनिरी.अकिल शेख,स.पो.फौज.लक्ष्मण शिंदे,पो.हवा.संतोष मोहिते. माणिक पवार, प्रविण शिंदे, सिध्दराम कोळी, राजेश रणसिंग, सचिन घोलप, प्रदीप सुर्वे,केरबा गलांडे, पो.ना.महेश वाघमारे,प्रविण काळभोर,गणेश बाजारे,अंकुश जोगदंडे,अमजद पठाण, संजयकुमार दळवी यांनी ही कामगिरी केलेली आहे.